# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ११**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: १८, रूपये:- २,०००/-**<br>**श्रीमती सुलभा खोडके** |
| (१) | ४७५८ | १० | अमरावती जिल्हयात जुलै, २०२२ मध्ये संततधार पाऊस व अतिवृष्टीमुळे दीड लाख हेक्टर क्षेत्रातील सोयाबीनचे नुकसान होणे, सोयाबीन हंगामाला महिनाभराचा अवधी असतानाच हंगामापूर्वी सोयाबीनचे दर किमान १००० रुपयांनी घटणे, त्यामुळे सोयाबीन शेतकरी व उत्पादकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाची भावना , यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सोयाबीन उत्पादकांना तातडीने अनुदान देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२) | ४७५९ | १० | "विदर्भातील संत्रीपट्टयात यंदा ही शेतक-यांना फळगळतीच्या समस्येला सामोरे जावे लागले असणे, अतिवृष्टी व बुरशीजन्य रोगाच्या प्रादुर्भावाने सुमारे दोन लाख टन संत्री गळून पडल्याचा अंदाज आहे यात शेतक-यांचे सुमारे ५०० कोटी रुपयांचे नुकसान झाले असणे, त्यामुळे शेतकरी वर्गात पसरलेली तीव्र नाराजी, याबाबत शासनाने दखल घेवून य भागात संत्री फळांच्या व्यवस्थापनासाठी जैविक आणि रासायनिक बुरशीनाशकांचा पुरवठा ५० टक्के अनुदानावर करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपयायोजना." |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३) | ४७९४ | १० | "विदर्भ व मराठवाड्यातील सुमारे 4000 दुष्काळग्रस्त गावांमध्ये तसेच विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाणपट्ट्यातील सुमारे 900 गावांमध्ये सहा वर्ष कालावधीत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने रुपये 4000 कोटी अंदाजीत खर्चाचा हवामान अनुकूल कृषी विकास प्रकल्प राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असणे, पुढे याच प्रकल्पाचे नाव 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' असे करण्यात आले असणे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत राज्य हिस्साकरिता मोठ्या प्रमाणात रकमा अर्थसंकल्पीत करण्यात येतात, सुरुवातीच्या 14 जिल्ह्यानंतर सदर योजनेत नाशिक जिल्ह्याचा देखील समावेश करण्यात आलेला असणे, तथापि सदरहू योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभाग |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अपयशी ठरलेला असणे, सदर योजनेची पुरेशी प्रसिद्धी शेतकऱ्यांमध्ये झालेली नसल्यामुळे तसेच या योजनेतील बऱ्याच अटी आणि शर्ती यांच्यामधील त्रुटी लक्षात घेता त्या दूर करून सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने मिशन मोडवर काम करण्याची आवश्यकता व याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.” |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (४) | ४७५० | १० | दर्यापूर मतदारसंघ हा संपूर्णतः खारपान पट्ट्याचा भाग असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेतकऱ्याना वैयक्तिक लाभाच्या योजने अंतर्गत त्यांचे धान्य सुखरूप साठवण्याकरिता धान्य गोदाम बांधण्याची परवानगी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा. |
| (५) | ४७५१ | १० | दर्यापूर मतदारसंघ हा संपूर्णतः खारपान पट्ट्याचा भाग असून याला भागातील शेतीमध्ये मोठ्या प्रामाणात क्षारांचे प्रमाण आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेतकऱ्याना सिंचनाची सोय उपलब्ध नसल्याने येथील शेतकऱ्याना शेतीपूरक व्यवसाय निर्माण होण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री कृषी सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेच्या धर्तीवर नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत अनुदानावर आधारित उद्योगधंद्यासाठी तथा व्यवसायासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. |
| (६) | ४७५२ | १० | दर्यापूर मतदारसंघ हा संपूर्णतः खारपान पट्ट्याचा भाग असून याला भागातील शेतीमध्ये मोठ्या प्रामाणात क्षारांचे प्रमाण आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यातील संपूर्ण गावाचा समावेश असून या प्रकल्पाअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेत जिप्सम या खत वाटपाचा समावेश करण्यात यावा. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: २०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (७) | ४७८८ | १० | “पशु वैद्यकीय चिकित्सालय व रोग अन्वेषण विभाग, पुणे या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच विभागातील इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनाचा मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असताना त्यातच राज्यात लंपी सारखा साथ रोग बळावत असताना पशुसंवर्धन विभागाच्या 867 पदांची भरती रद्द केल्यामुळे या विभागाकडून शेतकऱ्यांना व पशुपालकांना दिल्या जाणाऱ्या सेवा प्रभावित झाल्या असणे, राज्यात सरकारी नोकर भरतीसाठी महाभरती मेळाव्याचे आयोजन करणाऱ्या राज्य सरकारने जिल्हा परिषदांच्या पाठोपाठ पशुसंवर्धन विभागातील 867 पदांची भरती रद्द करून नव्या आकृतीबंधानुसार पशुसंवर्धन विभागातील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | परिचर पदे रद्द केली असणे, परिणामी स्पर्धा परीक्षा समन्वय समितीच्या उमेदवारांनी भरती परीक्षा लवकर घेण्याची केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे सरकार उमेदवारांच्या भावनेशी खेळत नसून शेतकऱ्यांच्या जीवनाशी देखील खेळत असल्याची भावना निर्माण झालेली असणे, यासंदर्भात तातडीने सर्व प्रक्रिया पूर्ण करून भरती करण्याची आवश्यकता, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: २३, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (८) | ४७९० | १० | "धनगर व तत्सम जातीमधील लाभार्थ्यांना कुकुट पक्षांच्या खरेदी व संगोपनासाठी अनुदान या योजनेकरिता नवीन लेखाशीर्ष सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, तथापि, राज्यातील सर्वसाधारणपणे दोन ते तीन वर्षापासून कुक्कुटपालन व्यवसायात खाद्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालामध्ये जसे मका, सोयाबीन, तांदूळ कणीच्या दरात मोठी वाढ झालेली असणे, उत्पादन खर्च वाढत असताना 'राष्ट्रीय अंडी समन्वय समिती' अनेकदा उत्पादन खर्चापेक्षा कमी दर जाहीर करत असणे, परिणामी कुक्कुटपालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असणे, अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जिल्ह्याच्या रहिवाशी असलेल्या पशुसंवर्धन मंत्र्यांकडे शिष्टमंडळ घेऊन जाऊन निवेदन दिलेले असणे, सदर निवेदनावर कार्यवाही करण्याचे मंत्र्यांनी आश्वासन दिलेले असतानाही अद्याप पर्यंत 'राष्ट्रीय अंडी समन्वय समितीच्या' मनमानी कारभारावर अंकुश आलेला नसणे, त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाविषयी पसरलेला संताप, यासंदर्भात अंड्याला योग्य भाव मिळून देण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**बाब क्रमांक: २९, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (९) | ४७३७ | १०० | कृषी पशुसंवर्धन दुग्धविकास व मासे व्यवसाय विभाग पूरक मागणी क्रमांक डी ०६ बाब क्र. 29 पान नंबर 20 रक्कम 1000 अरबी समुद्रात निर्माण झालेल्या क्यार व महा या दोन चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याकरिता रुपये १०,७५,७६,०००/- इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे सदरचा खर्च चालू वित्ती वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागवता येणे शक्य आहे म्हणून रुपये १००० ची लक्षणे पूरक मागणी प्रस्तावित केली आहे परंतु 128डहाणू (अ .ज ) विधानसभा मतदारसंघातील समुद्रकिनारा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असलेल्या घरांची या चक्रीवादळामुळे अतोनात नुकसान झाल्याने घराच्या घरे वाहून गेलेले असून त्यामुळे लोकं लोकांचे छत्र हरवले आहे अशा परिस्थितीमध्ये डहाणूच्या समुद्र समुद्रकिनारी असलेल्या गावांना संरक्षण करण्यासाठी संरक्षण भिंतीची नितांत आवश्यकता असणे त्यासाठी शासनाने पुरेश्या निधीची तरतूद करावी अशी मी मागणी करत आहे. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१०) | ४७८५ | १० | "अरबी समुद्रात निर्माण झालेल्या 'क्यार' व 'महा' या दोन चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याकरिता राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केलेला असणे, तथापि राज्यात बऱ्याच ठिकाणी हवामानातील बदलाचा परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणावर 'मत्स्य दुष्काळ' आलेला असणे, गेल्या अनेक दिवसांपासून मुरुडच्या समुद्रात मासे मिळत नसल्यामुळे नौका किनाऱ्यावर नांगरून ठेवाव्या लागत असणे, राज्यातील सुमारे 40% नौका नांगरून ठेवण्यात आलेल्या असणे, वारंवार होणाऱ्या हवामानातील बदलाचा मच्छीमारीवर मोठा परिणाम झालेला असणे, अचानक वाहणाऱ्या मतलई वाऱ्यामुळे खोल समुद्रातील मासेमारी 40% बंद असणे, अनेक नौका बंदरामध्ये नांगरून ठेवण्यात आलेल्या असणे, ज्या 60 टक्के नौका धाडसाने मासेमारीसाठी जातात त्यांनाही अत्यल्प मासळी मिळत असल्यामुळे राज्यात मस्त दुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली मागणी, मच्छीमारांचे लाखो रुपयांचे होत असलेले नुकसान, नौका मालकांना खलाशांचे वेतन, बँकांचे हप्ते, व्यापाऱ्यांकडून घेतलेली उचल, तसेच खलाशांचा आठवड्याचा खर्चही भागत नसणे, परिणामी राज्यातील रापण संघांनी मत्स्य दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांच्या धर्तीवर आर्थिक सहाय्य मिळण्याची केलेली मागणी, या मागणीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने बेकायदेशीर पर्ससीन मच्छीमार व्यावसायिकांवर, आणि एलईडी मच्छीमारांवर, परराष्ट्रातील मच्छीमार नौकांकडून होणारी मासळीची लूट, हाय स्पीड परप्रांतीय बेकायदेशीर मासेमारी यांच्यावर कडक कारवाई करण्याकडे केलेले दुर्लक्ष, यांच्यामुळे स्थानिक मच्छीमार व्यवसाय डबघाईला आलेला असणे, त्यावर उपजीविका करणाऱ्या कुटुंबीयांची उपासमार होत असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**बाब क्रमांक: ३०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (११) | ४७८७ | १० | "राज्यात 'प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत' मच्छीमारांसाठी अपघात गट विमा योजना सुरू करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला असणे, त्यासाठी नवीन लेखाशीर्ष देखील सुरू करण्यात येत असणे, तथापि दिनांक 19 फेब्रुवारी रोजी बोरीवली येथील मनोरी येथे लागलेल्या भीषण आगीत 10 मच्छीमारांच्या सुमारे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ९७ जाळ्या आणि त्यांच्या सहा शेड लागलेल्या आगीत भस्मसात झालेल्या असणे, सदर मच्छीमारांच्या नुकसान भरपाई साठी मुख्यमंत्री निधीतून 54 लाख रुपये मदत घोषित करण्यात आलेली असणे, परंतु अद्याप पर्यंत सदर मदत मच्छीमारांना मिळालेली नसणे, मनोरीच्या आपदग्रस्त मच्छीमारांना दिलेल्या मदतीच्या पार्श्वभूमीवर माहे जानेवारी मधील पहिल्या आठवड्यात बोरिवली शेजारी उत्तनच्या चौक बंदरात नांगरून ठेवलेल्या मासेमारी नौकेला लागलेल्या आगीत 'जॉन पॉल' नौका पूर्णपणे भस्मसात होऊन नौकेचा तांडेल 'क्याजिस्टन पास्तु मुंबईकर' जखमी झालेला असणे, सदर मच्छीमाराला देखील मनोरीच्या धर्तीवर मदत देण्याची आवश्यकता, या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना'' |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई